वाचले :-

१. सामान्य प्रशासन विभागाकडील आदेश क्र. सा.प्र.वि./२/३९०/२०२४ दिनांक ०८/०७/२०२४.

२. समाज विकास विभाग यांचेकडील दिनांक ११/०७/२०२४ रोजीचे पत्र.

३. मा. आयुक्त सो. यांचा दि.११ /०७/२०२४ रोजीचा मान्य् प्रस्ताव.

---

कटिबध्दा जनहिताय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८.
**सामान्य प्रशासन विभाग - तपासणी पथक.**
क्र. साप्रवि/तप१७अ/कावि/४१७/२०२४.
दिनांक - १२ / ०७ /२०२४.

**विषय :- 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' या योजनेसाठी नियुक्त केलेल्या कोपा-पासा (Computer Operator and Programming Assistant) प्रशिक्षणार्थी उमेदवारांना थंब/फेस रिडींगमधुन सवलत देणे बाबत.**

**आदेश,**

'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' या योजनेच्या सुकर अंमलबजावणीसाठी योजनेतील पात्र लाभार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज डेटा एन्ट्री करणेकामी महापालिकेतील विविध विभागात कामकाज करण्याकरीता एकूण ८८ कोपा-पासा प्रशिक्षणार्थी उमेदवारांच्या वाचले क्र.१ अन्वये नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. सदर योजनेचा कालावधी दिनांक १० जुलै २०२४ ते ३१ ऑगस्ट २०२४ असा आहे. वाचले क्र.२ च्या पत्रान्वये प्रशिक्षणार्थी उमेदवारांना सदर नियुक्तीच्या ठिकाणी वेळेवर पोहोचणेच्या दृष्टीने त्यांना थंब सवलत देणेकामी कळविले आहे.

सबब, मी उपायुक्त ,सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मा. आयुक्त सो. यांच्याकडील वाचले क्रमांक ३ च्या मान्य प्रस्तावानुसार प्रस्तुत आदेशान्वये 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेतील डेटा एन्ट्री करणाऱ्या संबंधीत ८८ कोपा-पासा प्रशिक्षणार्थी उमेदवारांना दिनांक १० जुलै २०२४ ते ३१ ऑगस्ट २०२४ अथवा योजनेची मुदत वाढवल्यास योजनेच्या अंतिम दिनांकापर्यंत थंब सवलत देण्यास या आदेशन्वये मान्यता देत आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेऊन महानगरपालिकेतील संबंधित ८८ कोपा-पासा प्रशिक्षणार्थी उमेदवारांना सोपविण्यात आलेल्या जबाबदारीमध्ये / कर्तव्यामध्ये तसेच अत्यावश्यक सेवेत विस्कळितपणा / अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याच्या अटीवर उपरोक्त प्रशिक्षणार्थी उमेदवारांना परिपत्रक क्र.प्रशा/तप/कावि/५०६/२०१०,दि.०९/१२/२०१० मध्ये निर्देशित केले प्रमाणे सदर परिपत्रकातील अ. क्र. ६(ड) व ८ मध्ये दिलेल्या निर्देशाचे पालन करावे.

( विठ्ठल जोशी )
**उपायुक्त,**
**सामान्य प्रशासन विभाग**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी ४११०१८.**

**प्रति,**

१. सर्व विभागप्रमुख / शाखाप्रमुख.
२. मुख्य लेखा परिक्षण.